# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १८ मार्च, २०१५
## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे :-**

**वित्त आणि नियोजन मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, २०११ च्या कलम ७ अन्वये वार्षिक योजना २०१५-१६ मधील प्रदेशनिहाय नियतव्ययाच्या वाटपाबाबतचे मा.राज्यपाल यांचे दिनांक १० मार्च, २०१५ रोजीचे निदेश" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना)**

**सर्वश्री हेमंत टकले,** सुनिल तटकरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई, या तालुक्यात मुबलक पाणीसाठा असतानासुध्दा तेथील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणे, नियोजित नळपाणी पुरवठा योजना, सार्वजनिक विहिरी व विंधन विहिरीची कामे मार्गी न लागल्याने त्या गावांवर पाणी टंचाईचे निर्माण झालेले संकट, शासनाने गेल्या काही वर्षात जलस्वराज्य भारत निर्माण व स्वजल धारा योजना अंमलात आणून कोट्यावधी रुपये उपलब्ध करुन देऊनसुध्दा या योजना यशस्वीपणे राबविल्या गेल्या नसल्याने निर्माण झालेली पाणीटंचाई, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांनी योग्य सांगड घालून दोडामार्ग मधील पाणीटंचाईचे कायमचे निवारण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. संजय दत्त,** मुझफ्फर हुसेन सय्यद, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील**:-**

"मुंबईतील कचऱ्यांची विल्हेवाट लावल्या जाणाऱ्या डम्पिंग ग्राऊंडची क्षमता

संपत चालली असून न्यायालयाच्या आदेशानंतर कांजूरमार्गच्या डम्पिंग ग्राऊंडचा मार्ग खुला होणार असताना नवीन विकास आराखड्यात डम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण ठेवले नसून मुलूंड आणि कांजूरमार्ग येथे डम्पिंग ग्राऊंडवर निवासी आणि कमर्शियल बांधकामाचे आरक्षण ठेवल्याचे माहे फेब्रुवारी २०१५ च्यासुमारास निदर्शनास येणे, मुलूंड व देवनारच्या डम्पिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास जागाच शिल्लक नसल्याने मुंबई पालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदारांना २५ वर्षांच्या कालावधीसाठी सवलतीच्या दरात पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव मुंबई महापालिकेने नगरविकास विभागाकडे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पाठविणे, राज्यातील ४० वर्ग (एक) शहरांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबतच्या प्रश्नाने अतिशय उग्र स्वरुप धारण केले असून, डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न सातत्याने भेडसावत असणे, मुंबई शहरात दररोज सुमारे १० हजार १६९ मेट्रीक टन जास्त कचरा गोळा होत असून एवढा मोठ्या प्रमाणातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई महानगरपालिका हतबल असणे, मुंबईतील एकही भाग असा नाही त्याठिकाणी नागरी वस्त्या नाही. त्यामुळे त्या-त्या भागात डंपिंग ग्राऊंडला नागरिकांचा होत असलेला विरोध, त्याच पध्दतीने ठाणे, रायगड व राज्याच्या इतर शहरी भागातही कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे, सी.आर. झेड. च्या अधिनियमामुळे समुद्र किनाऱ्यालगत डंपिंग ग्राऊंडचे प्रकल्प उभे करणे शक्य होत नसणे, तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य ती अनुमती दिली जात नसल्याने कचऱ्याचा प्रश्नांची सोडवणूक होण्यास विविध अडचणी निर्माण होणे व त्यामुळे प्रदुषणात वाढ होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असणे, तसेच नजीकच्या परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामामुळे तेथील रहिवाशांमध्ये पसरत असलेला असंतोष, त्यामुळे मुंबईतील कचऱ्यांची विल्हेवाट लावल्या जाणाऱ्या डम्पिंग गाऊंडचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(३) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षण क्र.१९२ कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ऑटो मोबाईल वर्कशॉप, आरक्षण क्र.१९३, जनावरांचा दवाखाना व वसाहत आरक्षण क्र.१९४, राज्य शासनाचे कार्यालय, आरक्षण क्र.१९५, केंद्र शासनाचे कार्यालय, आरक्षण क्र.१९७, माध्यमिक शाळा १८ मीटर व २४ मीटर रुंद विकास योजनेप्रमाणे रस्ता या आरक्षणाने बाधित होत असलेल्या जागेच्या बदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) वितरित करतांना भूमि अभिलेख विभागाकडून प्राप्त नकाशाची महानगरपालिकेकडून शहानिशा तसेच सर्वेक्षण न करता तसेच सदर जागेवरील अतिक्रमण न हटविता हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर)

मंजूर करणे, तसेच विकासकाकडून सदर जागेवर भरणी करण्याचे व वाडेभिंत बांधण्याची फी महानगरपालिकेकडून वसूल करण्यात आली असणे व सदर जागांवर अतिक्रमण केलेल्या नागरिकांनी सर्वेक्षण आक्षेप घेतलेला असल्याने भरणी व वाडेभिंत बांधण्यात आलेली नसल्याने केवळ विकासकाच्या फायद्यासाठी सदरचा टिडीआर बेकायदेशीरपणे मंजूर करणे, सदर जागेवरच्या उर्वरित टिडीआर मंजूर करु नये, अशा विषयाची तक्रार करुनही नुकताच १०५९५ चौ.मी.टिडीआर मंजूर करणे, या बेकायदेशीरपणे मंजूर केलेल्या टिडीअर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"महाराष्ट्राच्या मराठी तनामनात स्फूर्ती आणणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना सर्वच मानवंदना देत असणे, महाराजांचे कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व आज जगाला व महाराष्ट्राला दीपस्तंभाप्रमाणे असणे, महाराजांनी निर्माण केलेले गडकिल्ले आज हिंदवी स्वराज्याचा इतिहास सांगत असणे, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपण ऐकणे, त्यांचे दर्शन घेणे, त्यांचे पोवाडे गाणे, महाराजांना अनुभवण्याचा प्रयत्न करणे, यात सिंधुदुर्ग भाग्यवान असणे, या किल्ल्यावर इतिहासाचे सोनेरी पान न्याहाळावयास मिळणे, प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या डाव्या पायाचा अन उजव्या पायाचा ठसा येथे पाहावयास मिळणे, अरबी समुद्रात उभा असलेला सिंधुदूर्ग हा हिंदवी स्वराज्याचा शिलेदार असणे, अशाचप्रकारचे अनेक किल्ले महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असणे, या सर्व किल्ल्यांचे संवर्धन होणे गरजेचे असणे, त्यामधून महाराजांचे महाराष्ट्राप्रती असणारे प्रेम सदैव पुढील पिढीस प्रेरणा देत राहत असणे, यासाठी महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांचे चांगल्याप्रकारे संवर्धन व जतन करण्याबाबत त्वरीत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुळशी केंद्र आणि महाराष्ट्र शासनाने मुळशी तालुक्यातील ६६ गावांना इको सेन्सेटिव्ह झोन जाहीर करणे, याच्याविरुध्द जनतेने तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा काढणे, मुळशी तालुक्यातील जनतेला विश्वासात न घेता इको सेन्सेटिव्ह झोन लागू करण्याची प्रक्रिया सुरू करणे, त्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनीवर आरक्षण टाकून व्यापाऱ्यांच्या भल्यासाठी आरक्षण ठेवण्याचा डाव असल्याची सर्व स्तरातील जनतेमध्ये भावना निर्माण होणे, यासाठी सर्व पक्षीय मोर्चा काढून निषेधही नोंद

करण्यात येणे, या इको झोनमुळे शेतकऱ्यांवर ३२ अटी लादण्यात येणे, त्यामुळे शेतकरी या परिसरामध्ये शेती करु शकत नसल्याचे आढळून येणे, शेतकऱ्यांमध्ये असलेली तीव्र नाराजीची भावना लक्षात घेऊन इको झोन तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, याबाबत शासनाची भूमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**सहा : शासकीय विधेयके -**

**(क) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -**

सन २०१५ चे वि.स.वि.क्रमांक ९ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१५.

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१५.

---

## - मध्यंतर -

**(दुपारी २.०० वाजता)**

**सात : वित्त आणि नियोजन मंत्री सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ मार्च, २०१५.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.